ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ''वाकाटक राजवटीतील स्त्रियांचा राजकारणातील प्रेरणादायी सहभाग''

प्रा.डॉ.वाय.एस.माहुरे
शि.प्र.मं.विज्ञान व गिलाणी कला वाणिज्य महाविद्यालय,घाटंजी.



*गोशवारा*

भारतीय संस्कृती ही जगातील प्राचिन संस्कृती इथे प्राचिन काळापासुन स्त्रियांचा सनमान केला जातो. वाकाटक राजवटीत राजघराण्यातील स्त्रियांना बरोबरीने वागविले होते. एवढेच नव्हे तर राजघरातील स्त्रियांनी परिस्थितीला अनुसरून राज्यकारभार समर्थपणे साभांळला होता. प्रभावती गुप्ता, अज्झितभट्टरीका, लोकप्रकाशा हया त्यापैकी होय. या स्त्रियांनी राजकिय विषयावर चर्चेत सहभाग घेतला तसेच योग्य निर्णय घेण्यातही त्या अग्रेसर होत्या. त्याच्यामुळे राजघराण्याला प्रसिध्दी मिळाली. अर्थातच त्यांनी मिळविलेले राजकिय वर्चस्व घेतलेले निर्णय, केलेले कार्य व सहभागीत्व आधुनिक काळातील सत्तेत सहभागी असलेल्या स्त्रियासाठी निष्चितच प्रेरणादायी ठरते.

**प्रस्तावनाः—**

प्राचिन भारताच्या इतिहासतील गुप्त घराण्याचे संपुर्ण भारतावर वर्चस्व होते, ज्यामध्ये दक्षिण भारतामधील लहान राज्यांनी गुप्तांचे मांडलिकत्व पत्करून अप्रत्यक्षरित्या गुप्त राजनितीला हातभार लावला होता.आपली राजकिय शक्ती वाढविण्यामध्ये गुप्त सम्राटांना मोठे यश लाभले होते. वाकाटक ही दक्षिणेतील महत्वपुर्ण सत्ता लक्षात घेवुन चंद्रगुप्त दुसरा याने मैत्री संबंध प्रस्तापित करण्यासाठी व्दितीय रूद्रसेनाशी आपल्या मुलीचा म्हणजेच प्रभवतीगुप्ताचा विवाह घडवुन आणला होता.यातुन वाकाटकांच्या राजकिय संरचनेत बदल झाला आणि स्त्रियांना वाव मिळाला.

वाकाटक राणी प्रभावती गुप्ता हीने अल्पवयात 25 व्या वर्षी आलेले वैधव्य स्विकारून मोठया धाडसाने परिस्थितीशी समोर जात मुलगा दिवाकर सेनच्या नावे प्रत्यक्ष कारभार चालविला होता व अनेक महत्वपुर्ण कार्य सिध्दिस नेले. माता—पित्यांनी तीचे सांत्वन केले आणि लष्करी व प्रशासनिक मदत देण्याचे वचन दिले.यातुन वाकाटक दरबारी चंद्रगुप्ताचे प्रशासनिक मुत्सद्याचे एक शिष्ट मंडळ दाखल झाले त्यामध्ये आपल्या नातवंडांना संस्कार वृत्ती देण्यासाठी शिक्षक व राजदुत म्हणुन कुलगुरू कालीदास याला ही पाठविले.पुढे कालीदासाच्या रूपाने विदर्भात 'मेघदुत' काव्याचा जन्म घडुन आला.

इ.स.420 मध्ये पुत्र दिवाकर सेनाचे निधन झाले व विधवा व्रता बरोबरच पुत्र विरहाचे दुःख सुध्दा तीच्या वाटयाला आले.मात्र कुठेच खचुन न जाता पित्याच्या मदतीने तीने राज्य स्थिर स्थावर केले.प्रसंगी पित्यालाही लष्करी सहकार्य देण्यात विलंब केला नाही. दरबारात ब्राम्हण विद्वानांच्या नियुक्त्या केल्या. वैदीक धर्माचे पालन करून ब्राम्हणांना प्रचंड दानधर्म केला.रामगिरी स्वामीची म्हणजे तथागत बुध्दाची पुजा ही केली.बौध्द संस्कृतीचे संवर्धन ही घडवुन आणले.

या प्रमाणेच नरेंद्रसेनाची पत्नी राणी अज्झीतभट्टारीका हीने ही वाकाटक राजनितीला सहकार्य केले. वाकाटक व राष्ट्रकुट यांचेतील वैरभाव संपविण्यासाठी चंद्रगुप्त दुसऱ्याने अज्झीतभट्टारीका हीचा विवाह वाकाटक

घराण्यात केला व मैत्रीचे,शांततेचे वातावरण निर्माण केले. वाकाटकांचा मांडलिक भरतबल याची राणी लोकप्रकाशा हीने 'महादेवी' ही पदवी धारण केली व प्रशासनात प्रत्यक्ष नसला तरी अप्रत्यक्ष सहभाग असल्याचे सिध्द केले. लोकप्रकाशा हीने परधर्म सहिष्णुता जोपासली, ज्यामुळे विदर्भात बौध्द धर्म संस्कृती भरभराटीला पोहचली.वाकाटक सत्तेच्या सांस्कृतीक विकासाला लोकप्रकाशा राणीने हातभारच लावला होता.राष्ट्रकुटांची राणी महादेवी शावलंगी हीने तत्कालीन कायदशीर नियमांचे पालन करून विभुराजाच्या संमतीने दान धर्म विधी करून ताम्रपट कोरला हीच्याच कारकिर्दीत विदर्भातील अचलपुर (जि.अमरावती) येथे राष्ट्रकुटांची एक शाखा विकसीत झाली. वैदिकधर्माचा पुरस्कार करून शिवाची उपासना केली व त्याचबरोबर सांस्कृतीकविकासासाठी प्रचंड योगदान दिले त्याचा मागोवा घेत वाकाटक घराण्यातील स्त्रियांचा राजकिय जीवनातील सहभाग भविष्यकाळातील स्त्रियासाठी प्रेरणादायी ठरावा.

### 3.3 अ) प्रभावती गुप्ता :—

प्रभावती गुप्ता ही गुप्त घराण्याचा राजा चंद्रगुप्त दुसरा याची मुलगी असल्याने तीला लहानपणापासुनच उत्तम शिक्षणाचे धडे मिळाले होते.व्यवहारशास्त्र, राजनितीशास्त्र, अर्थ इत्यादी प्रकारचे शिक्षण तीला लाभले होते.

मुजुमदार नुसार,राजघराण्यातील स्त्रीया व उच्च कुलीन स्त्रीया यांच्या शिकविण्याकरीता प्रसादातच शिक्षणची व्यवस्था केली जात होती,तसेच त्यांच्या साठी विशेष शिक्षकांची व्यवस्था होती.[1]

अनविता आनंद नुसार,कालीदासाच्या अभिज्ञान शांकुतलम नाटयामधील शकुंतला आपला प्रियकर दुशंतला तमल पत्रावर पत्र लिहीते.[2]

यावरून गुप्त काळात स्त्रीयांना शिक्षणाचे स्वातंत्र होते असे निदर्शनास येते.राजकुळातील स्त्रीयांना तर सार्वजनिक शिक्षणाबरोबरच राजकिय शिक्षणाचे उत्तम धडे दिल्या जात असावे असे लक्षात येते.

प्रभावतिला राजनितीशास्त्रावरील दिलेल्या शिक्षणामुळेच प्रभावतीनेच वाकाटक घराण्याशी संबंध जोडण्यात काहीही हरकत घेतली नव्हती. व वाकाटक नृपती पृथ्वीसेनाचा पुत्र व्दितीय रूद्रसेनशी विवाह केला आणि गुप्त व वाकाटक घराण्याचे राजनितीक संबंध सलोख्याचे प्रस्थापीत झाले. या विवाहामुळे गुप्ताच्या राजकिय सामर्थ्यामध्ये वाढ झाली,तसेच दक्षिणेकडील वाकाटक सत्तेकडे लक्ष देण्याचे कार्यही उरले नाही.

प्रभावती व रूद्रसेन व्दितीय यांच्या विवाहातुन गुप्तांची राजकिय खेळी यशस्वी झाली असली,तसेच वाकाटकांनी सहजपणे स्विकारली असली तरी खरे राजकिय कौषल्य हे प्रभावतीचे पणाला लागले होते व त्यात प्रभावतीने विवाहास स्विकार देवून दोन्ही सत्ताधिशांचे राजकिय हेतु सिध्दीस नेले यात शंका घेता येत नाही.

वरील कृत्यातुन प्रभावती गुप्ताच्या राजकिय योगदानाची भुमीका स्पष्ट होते.वाकाटक राजसत्तेची रूद्रसेन दुसऱ्याने सत्ता हाती घेतल्यानंतर त्याच्या प्रत्येक निर्णयाच्या वेळी प्रभावती गुप्ताचे अप्रत्यक्ष समर्थन होते.अर्थात प्रभावती गुप्ता त्याच्या बरोबर होती.पती रूद्रसेनाला साम्राज्याच्या विकासा करीता प्रशासकिय अंदाजपत्रक तयार करतांना प्रभावती त्याला मदत करीत होती.[3]विकासात्मक योजनांच्या चर्चेत सहभागी होती. अर्थात तत्कालीन काळात हस्तक्षेपासाठी वाव नव्हता तरीही प्रभावतीने स्त्रिसामर्थ रूजविले होते.

प्रभावतीचे राजनैतिक कौशल्य पणाला लागले ते म्हणजे तीच्या पतीच्या निधनानंतर,कारण लग्न होवून जेमतेमच वर्ष झाली होती,आणि मुलेही लहानच होती,तसेच तीचे वयही पंचविसच्या आसपासच होते.म्हणजेच अगदी तारूण्यात तीच्यावर संसाराचे प्रचंड ओझे पडले होते व वैधत्व तीच्या वाटयाला आले होते.

प्रभावतीचा वाकाटक घराण्यात इतका प्रभाव होता की,तीला महान प्रतापी व माननिय महीला म्हणुन तीचा गौरव केला जात असे.त्यामुळे सहाजीकच पतीच्या निधनानंतर राज्यकारभार सांभाळण्याची जबाबदारी प्रभावती गुप्ताकडेच आली आणि प्रभावतीनेही अगदी समर्थपणे सन 390 ते 410 इतक्या प्रदिर्घ कालखंडापर्यत अभिभावकाच्या रूपात समर्थपणे सांभाळली.[4]

प्रभावतीने वाकाटक सत्तेच्या नावाने राज्यकारभार सुरू केला, प्रभावती गुप्ताला राजकिय वारसा असल्याने तीचा कारभार हा गुप्त साम्राज्याचा एक भाग बनला होता.अर्थात गुप्तांनी आपल्या मुलीला राज्यकारभारात पाहीजे ती मदत दिली व प्रभावतीने वाकाटकांची राजकिय अस्थिरता लक्षात घेवून भारतात प्रभावी असलेल्या गुप्त साम्राज्याची मदत घेवून वाकाटकांचे साम्राज्य टिकवून ठेवले. तसेच गुप्तांनाही प्रभावतीच्या प्रशासनाची अडचणीच्या वेळी प्रामुख्याने मदत मिळाली.

पुढे प्रभावती गुप्तांच्या माध्यमातुन चंद्रगुप्ताला शक विरोधी युध्द मोहीमेत आता कोणतीही अडचण राहीली नाही,कारण वाकाटकांची लष्करी मदत चंद्रगुप्ताला मिळणारी होती, किंवा ते मैत्रीकारणातुन ही तटस्थ राहणार होती. वास्तविक गुप्तसम्राट आपल्या मातांच्या नावाचा उल्लेख करीत असले तरी स्त्रिया प्रशासनात कोणताही परिणामकारक भाग घेत नसत.दुसऱ्या चंद्रगुप्तांची मुलगी प्रभावती गुप्ता ही वाकाटक राज्यात काळजीवाहु प्रमुख म्हणुन कारभार पाहत असे,परंतु गुप्त साम्राज्यात अशी उदाहरणे नाहीत.[5]मात्र प्रभावतीने आपला अज्ञान मुलगा दिवाकरसेन याच्या नावे 13 वर्ष राज्यकारभार पाहीला.

पुढे प्रभावतीची समर्थता पणाला लागली ती दिवाकरसेनच्या मृत्युच्या काळी अर्थात दुर्दैवाने दिवाकर सेनची राजवट अल्पकालीन ठरली, कारण सन 420 मध्ये त्याचे अकाली निधन झाले तेव्हा प्रभावती गुप्ता पुत्र निधनाने फार खचुन गेली होती. मात्र तीने अधिक सामजस्य राखुन आपला धाकटापुत्र दामोदरसेन याला गादीवर बसविले.[6] वाकाटकांची संरक्षक म्हणुन राज्यकारभार पाहीला प्रभावतीच्या सल्ल्याने पुना ताम्रपट व ऋध्दपुर ताम्रपटामध्ये तीने आपली माता कुबेरनागा हीला 'महादेवी' पदवीने सन्मानित केले व एक आदर्श 'मातृभक्त राजकन्या' म्हणुन मान्यता मिळविली. तसेच सासरचा उल्लेख न करता आपल्या पितृ गोत्राचा दान पत्रामध्ये सार्थ अभिमानपुर्वक उल्लेख केला. तसेच कालीदासाच्या रूपाने विदर्भात मेघदुत काव्याचा जन्म घडवून आणला.

पुढे व्दितीय प्रवरसेनाच्या तीरोडी ताम्रपटामध्ये त्याने आपल्या दिवंगत पित्याचा उल्लेख न करता केवळ माता प्रभावतीचा उल्लेख केला आहे.तसेच नरतंगवारी तिर्थाला प्रभावती व प्रवरसेन दुसरा हेच सोबत गेले होते.[7] तसेच व्दितीय प्रवरसेनने आपल्या मातेला विश्वासात घेवून आपली राजधानी प्रवरपुरला नेली होती.प्रभावतीने प्रशासनातील अधिकारी पदे ही ब्राम्हणांना दिली होती.[8]

विदर्भातील वाशिम शाखेचा शासक विंध्यशक्ती व्दितीय शक्तीशाली झाला होता. वाकाटक वंषात प्रभावतीला जेष्ठता लाभल्यामुळे व तीने अल्पवयीन राजपुत्राच्या माध्यमातुन शासन भार स्विकारल्यामुळे विंध्यशक्ती नाराज झाला होता.मात्र प्रभावतीच्या पाठीवर चंद्रगुप्ताचा मदतीचा हात असल्यामुळे विंध्यशक्तीने शांतता ग्रहन केली होती. यातुनच वाकाटक आणि वाशिम यांच्यात शांतता पुर्व संबंध निर्माण झाले.

दरम्यानच्या काळात आपला पिता चंद्रगुप्त याला हया विधवा राणीचा गुजरात काठीयावाड मोहीमेत भरपुर सहाय्य केले होते.[9]आपल्या असे निदर्शनास येईल की,वाकाटक किंवा गुप्त घराण्यात राजाच्या राणीने किंवा राजकुमारीका यांनी प्रशासनात खुप सक्रीय सहभाग घेतलेला नाही.राणी कुमारदेवी,राणीधृवदेवी,इक्ष्वांकु घराण्यातील राजराण्या राजकुमारी कोसलची राणी पल्लव वंशातील युवरांज्ञी चारूदेवी यांनी आपला पती किंवा सासरे यांच्या मदतीवर प्रशासनात सहभाग घेतला होता. मात्र येथे एकमेव प्रभावती गुप्ता हीने वाकाटक राज्याअंतर्गत प्रत्यक्ष शासन सुत्रे आपल्या हाती घेतले होते.[10]तत्कालीन राण्याच्या तुलनेत प्रभावती गुप्ता हीचे राजनैतिक दृष्टया बहुमुल्य योगदान ठरते.

### 3.3 ब) अज्झितभट्टरीकाः—

व्दितीय प्रवरसेनानंतर सन 450 च्या सुमारास त्याचा मुलगा नरेंद्रसेन हा वाकाटकांच्या गादीवर आला. मनपुरच्या राष्ट्रकुट नृपती राजकन्या अज्झितभट्टरीका हीच्याशी त्याचा विवाह झाला.[11]तत्कालीन राजनैतिक परिस्थिती प्रमाणे गुप्ताच्या नंतर वाकाटक सत्तेचा प्रभाव मोठया प्रमाणावर होता.वाकाटक वंशासोबत चालु असणाऱ्या वैर संबंधाना हया विवाहामुळे पुर्ण विराम मिळाला.[12] नरेंद्रसेनाचे वडिल प्रवरसेन व्दितीय हे राजनैतिक दृष्टया दुरदृष्टीकोनाचे होते.त्यांनी शांततेच्या धोरणांचा स्विकार करून राजवृध्दी करण्याच्या निमीत्ताने गुप्त घराण्याशी स्नेह राखला. यावेळी कुंतल प्रदेशाची राजधानी मानपुर होती.

अज्झितभट्टरीका व नरेंद्रसेन यांचा विवाह गुप्त सम्राट चंद्रगुप्त दुसरा यांच्या मदतीने घडुन आला, आणि राष्ट्रकुट व वाकाटक या राजघराण्यातील मागील वितुष्ट नाहीसे होवुन त्यांच्यात वैवाहीक संबंध प्रस्तापित झाले.[13] राष्ट्रकुट बरेच प्रबळ असुन त्यांचे राज्य वत्सगुल्मच्या वाकाटक शाखेच्या राज्याला लागुन असल्यामुळे त्यांचे वाकाटक राजांशी अनेकदा खटके उडाले होते.ही माहीती दोन्ही राजवंशाच्या कोरीव लेखात आढळते.

हया विवाहामुळे नरेंद्रसेनाला माळव्यात यश मिळविण्यासाठी राष्ट्रकुटांची बरीच मदत झाली होती. अशाप्रकारे अज्झितभट्टरीका हिच्या विवाह संबंधामुळे दक्षिणेतील हे दोन राजघराणे एकत्रित आल्याने आल्याने वाकाटक राजा नरेंद्र सेनाचे दक्षिणेतील राजनैतिक क्षेत्रात वजन वाढले.येथुनच गुप्तांचे अनेक मांडलिक राजे वाकाटकांच्या आश्रयाखाली येण्यास सुरूवात झाली.ज्यामध्ये मेकला राजा,कोसल राजा भिमसेन,मालव राजा अनुपेष्वर इत्यादींनी नरेंद्र सेनाचे वर्चस्व स्वतःहुन स्विकारले.[14] यावरून अज्झितभट्टरीकाचे राजकिय वर्चस्व सिध्द होते.

गुप्तांच्या दानपत्रात व ताम्रपटांच्या मुद्रावरील लेखात त्यांच्या राण्यांना निर्देश आढळतो.तसा वाकाटकांच्या दानपत्रात आढळत नाही.याला अपवाद फक्त दोनच राण्यांचे आहेत,व्दितीय रूद्रसेनाची अग्रमहीषी प्रभावती गुप्ता व नरेंद्रसेनाची राणी अज्झितभट्टरीका.

अज्झितभट्टारीका हिने नरेंद्रसेनाला प्रशासनिक कामकाजात अप्रत्यक्षपणे निश्चितच सहकार्य दिले होते. मात्र प्रत्यक्षरित्या तिने प्रभावती गुप्ताप्रमाणे प्रशासनिक सुत्रे हाती न घेतल्यामुळे तिला राज्यकारभारात अप्रत्यक्ष स्वरूप मिळाले. नरेंद्रसेनाला अज्झितभट्टारीकाच्या कदंब येथील परिवाराने सक्रिय सहाय्य केले होते. या मदतीमधुनच नरेंद्रसेनाला आपली किर्ती,समृध्दी, प्रतिष्ठा निर्माण करण्यात यश मिळाले होते.[15] म्हणजेच ज्याप्रमाणे गुप्तराणी कुमारदेवी, ध्रुवदेवी, आंध्रमधील इक्ष्वांकु घराण्यातील राण्या राजकुमारीका, कोसल राणी,पल्लव वंषाची युवराज्ञी चारूदेवी यांनी जसे आपल्या राजांना युवराजपुत्रांना,सासऱ्यांना प्रशासनिक सहाय्य दिले तसेच अज्झितभट्टारीका हिने वाकाटक शासनात सहाय्य दिले होते. अज्झितभट्टारीका राणीचा प्रशासनातील सहभाग आपणास नरेंद्रसेनाच्या दान पत्रामधील मजकुरा मध्ये दिसुन येतो.

थोडक्यात अज्झितभट्टारीकाचा पती राजा नरेंद्रसेन याची कारकिर्द 20 वर्षे चालु सन 470 च्या सुमारास समाप्त झाली. ज्यावेळी नलवंशी राजा भवदत्ता वर्मा व राजपुत्र अर्थपती यांनी विदर्भावर आक्रमण केले.त्यावेळी नरेंद्रसेनाचा इ. स. 470 मध्ये मृत्यु झाला व येथेच राणी अज्झितभट्टारीका हीची राजकीय कारकिर्द संपुष्टांत आली.[16]

### 3.3 क) लोकप्रकाशा :–

गुप्त घराण्यामध्ये जसे सामंताचे महत्व वाढले त्याच प्रमाणे वाकाटकांच्या काळात सुध्दा दक्षिणेत सामंताचे अस्तित्व निर्माण झाले होते.[17] वाकाटकाच्या जेष्ठ शाखेचा मांडलिक भरतबल यांचा ब्रम्हणी ताम्रपट रीवा संस्थानमध्ये ब्रम्हणी गावात सापडला.

डॉ.बहादुरचंद्र छावडा यांनी तो वाचुन एपिग्राफिया इंडियामध्ये प्रकाशित केला.त्याचप्रमाणे भरतबल नृपती याचा विवाह कोसल देशाची राजकन्या लोकप्रकाशा हिच्याशी झाला.लोकप्रकाशा ही देवकुलातील कन्या होती. ब्रम्हणी ताम्रपटात भरतबलाच्या वंशाची वंशावळ आहे.[18]

भरतबलाचे पुर्वज जयबल व वत्सराज यांनी महाराज ही पदवी लावली नाही,परंतु येथे महाराज ही पदवी नागबल व भरतल यांनी लावली होती व राणी लोकप्रकाशा हीने महाराणी या पदवीचा स्विकार केला होता. ज्याप्रमाणे गुप्तकाळात राजपद पितृसत्ताक वंशपरंपरेने चालत आले तसेच सामंत वर्गामध्ये सुध्दा हयाच पध्दतीचा अवलंब झाल्याचे निदर्शनास येते.

बालाघाट ताम्रपटातील माहीती प्रमाणे मेकल देशावर राज्य करणारे पांडव वंशी नृपती वाकाटक नरेंद्रसेन याचे मांडलिक होते. पांडव वंषी भरतबल याने आपल्या ब्रम्हणी ताम्रपटात नरेंद्रसेनाची प्रच्छन्न स्तुती केली, यावरून त्याने त्याचे स्वामीत्व कबुल केले होते हेच निदर्शनास येते. वाकाटक राजवटीला सहाय्यक असे कार्य भरतबल याने केले,तसेच त्यांच्यात दृढ मैत्री व सामजस्य प्रस्थापित झाले.[19] बालाघाट ताम्रपटावरून असे स्पष्ट होते की, वाकाटक नरेश नरेंद्रसेनाच्या आज्ञा कोसला, मेकला व मालव देशाच्या अधिपतींनी शिरसावद्य मानल्या होत्या.म्हणजेच नरेंद्रसेनाच्या आज्ञेत राजकुमारी लोकाप्रकाशा हीचे वडिल वागत असुन ते कोसल देशाचा कारभार पाहत होते.आरंग ताम्रपटात सुध्दा असेच दिसुन येते की, कोसल व वाकाटक राजे यांचे स्नेहाचे संबंध होते, गुप्तांच्याच राजवटीत मेकला देशाचा कारभार चालत होता.त्याच देशाचा राजा भरतबल हयाच्याशी लोकप्रकाशाचा हीचा विवाह झाला होता, येथे महत्वाचे असे की, लोकप्रकाशाचे माहेर व सासर हे दोन्हींही घराणे वाकाटकांचे

सामंत म्हणुन राजवटी चालवित होते. या विवाहामधुन सामंतशाहीला महत्व लाभले व दोन घराण्यातीन स्नेहभाव अधिक वृध्दींगत झाला असे आपणास निदर्शनास येते यातुनच गुप्तांचे राजकीय वर्चस्व वाकाटक व त्याच्या सामंत राज्यावरही होते हे सिध्द होते.[20]

राजदरबारामध्ये वावरणाऱ्या दास–दासी, अधिकारी वर्गासोबत राणी लोकप्रकाशा हीने कोणत्याही प्रकारचा भेदभाव न राखता आपलेपणा दर्शविला यातुन सहिष्णुतावर्धीत होण्यास हातभार लावला होता.[21]

## सारांशः–

वरील विवेचनावरून वाकाटक काळात प्रभावतीच्या राजकिय प्रभावाची विषेशत्वाने जाणीव होते.तीने मोठया धाडसाने विवाहास संमत्ती दर्शवून दोन सत्ताधिशामध्ये परंस्पर सामजंस्य घडवून आणण्यात फार मोठया राजकिय कसोटीतुन प्रभावतीला जावे लागले होत,तसेच प्रभावतीने अल्प काळातच पतीच्या निधनानंतर आपल्या अल्पवयीन मुलांच्या नावाने समर्थपणे राज्यकारभार सांभाळला व गुप्ताचे सहकार्य घेवून अस्थिरता माजु दिली नाही.प्रभावतीवर अनेक संकट आलीत पण तीने मोठया धिराने प्रत्येक संकट परतुन लावले व त्यातुन मार्ग काढला व वाकाटकांची सत्ता टिकवून ठेवली. प्रभावतीच्या काळात वाशिम शाखेच्या विंद्यशक्ती व्दितीय प्रभावतीच्या वर्चस्वाने अत्यंत नाराज झाला होता. परंतु हा प्रसंगही तीने मोठया चातुर्याने सोडविला व शांतता पुर्ण संबंध प्रस्थापीत केले.एकंदरीत प्रभावतीने राजनितीला अनुसरून राजकिय समर्थता सांभाळत वाकाटक सत्तेमध्ये स्थैर्य निर्माण केले. त्याचबरोबर अज्झितभट्टारीका हीने वाकाटक घराण्याची वैवाहीक संबंधास मान्यता देवून वाकाटकांशी चालु असलेले वैर संबंध समाप्त केले.हे फार मोठे अज्झितभट्टारीकाचे राजकिय धाडस मानावे लागते.ती प्रभावती गुप्ताप्रमाणे प्रत्यक्ष राज्यकारभाराचे कार्य करीत नसली तरीही, पती नरेंद्रसेनाच्या खांदयाशी खांदा लावून होती व नरेंद्रसेनाचे राजकिय सामर्थ वाढविले होते.तसेच भरतबलाची राणी लोकप्रकाशा हीचा अप्रत्यक्ष आपल्या पतीला पाठिंबा असुन प्रत्येक कार्यात ती पतीच्या पाठीशी होती. लोकप्रकाशाच्या मदतीने कोसलच्या पांडवांशी स्नेहाचे संबंध प्रस्थापीत झाले.हा राजकिय क्षेत्रातील योगदानाचा लोकप्रकाशाचा सहभाग होता.लोकप्रकाशाने दरबारातील अधिकारी व स्त्रीयांना तसेच दास दासींना कोणत्याही प्रकारची दुय्यम वागणुक दिली नाही,यावरून राजकारणातील तीची सहिष्णु वृत्ती दिसुन येते. एकंदरीत वाकाटक राजघराण्यातील स्त्रीयांचा राजकारणातील सहभाग आधुनिक काळातील स्त्रीयांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरतो.

## संदर्भ ग्रंथ सुचीः–


1. डॉ.मुजुमदार,रमेशचंद्र,डॉ.अल्तेकर अनंत सदाशिव,वाकाटक–गुप्त युग,श्री सुंदरलाल जैन, मोतीलाल बनारसीदास,बंगला रोड, जवाहर नगर दिल्ली–7 प्रथम संस्करण,1968प्.क्र.405
2. श्रीमती अन्विता आनंद,गुप्त काल मे नारीयोकी स्थिती,राधा पब्लिकेशन, अन्सारीरोड, गलीगुरारीलाल, दरीयागंज,नई दिल्ली,1992 पृ.क्र.43
3. शर्मा आणि कुलकर्णी,भारतीय संस्कृती दर्षन,अ.बा.कुलकर्णी कॉन्टीमेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे, 30, प्रथमावृत्ती पृ.क्र.148
4. डॉ.मिराशी वासुदेव विष्णु,भवभुती ग.रा.भटकळ,पॉप्युलर प्रकाशन,35 सी.,ताडदेव रोड,मुंबई 34 ब्ल्यु,सी,पहीली आवृत्ती 1968 पृ.क्र.42
5. शर्मा आणि कुलकर्णी,भारतीय संस्कृती दर्शन,अ.बा.कुलकर्णी कॉन्टीमेन्टल प्रकाषन विजयानगर, पुणे, 30, प्रथमावृत्ती पृ.क्र.248
6. डॉ.मिराशी वासुदेव विष्णु,भवभुती ग.रा.भटकळ,पॉप्युलर प्रकाशन,35 सी.,ताडदेव रोड,मुंबई 34 ब्ल्यु,सी,पहीली आवृत्ती 1968 पृ.क्र.43
7. डॉ.मिराशी वासुदेव विष्णु,भवभुती ग.रा.भटकळ,पॉप्युलर प्रकाशन,35 सी.,ताडदेव रोड,मुंबई 34 ब्ल्यु,सी,पहीली आवृत्ती 1968 पृ.क्र.260
8. डॉ.मिराशी वासुदेव विष्णु,भवभुती ग.रा.भटकळ,पॉप्युलर प्रकाशन,35 सी.,ताडदेव रोड,मुंबई 34 ब्ल्यु,सी,पहीली आवृत्ती 1968 पृ.क्र.42
9. डॉ.मुजुमदार,रमेशचंद्र,डॉ.अल्तेकर अनंत सदाशिव,वाकाटक–गुप्त युग,श्री सुंदरलाल जैन, मोतीलाल बनारसीदास, बंगला रोड, जवाहर नगर दिल्ली–7 प्रथम संस्करण,1968प्.क्र.109

10. डॉ.मुजुमदार,रमेशचंद्र,डॉ.अल्तेकर अनंत सदाशिव,वाकाटक–गुप्त युग,श्री सुंदरलाल जैन, मोतीलाल बनारसीदास,बंगला रोड, जवाहर नगर दिल्ली–7 प्रथम संस्करण,1968पृ.क्र.289
11. डॉ.मिराशी वासुदेव विष्णु,भवभुती ग.रा.भटकळ,पॉप्युलर प्रकाशन,35 सी.,ताडदेव रोड,मुंबई 34 ब्ल्यु,सी,पहीली आवृत्ती 1968 पृ.क्र.46
12. डॉ.मुजुमदार,रमेशचंद्र,डॉ.अल्तेकर अनंत सदाशिव,वाकाटक–गुप्त युग,श्री सुंदरलाल जैन, मोतीलाल बनारसीदास,बंगला रोड, जवाहर नगर दिल्ली–7 प्रथम संस्करण,1968पृ.क्र.112
13. राय कृष्णदास,भारतीय मुर्तीकला प्रधानमंत्री,ना.प्र.सभा,काशि,व्दितीय संस्करण, 1996,पृ.क्र.47
14. प्रा.सिंगारे अनिल, दक्षिण भारताचा इतिहास, सातवाहन ते यादव, के. एस. शतकरे, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती,जुन 1997,पृष्ठ क्र.54
15. डॉ.मुजुमदार,रमेशचंद्र,डॉ.अल्तेकर अनंत सदाशिव,वाकाटक–गुप्त युग,श्री सुंदरलाल जैन,मोतीलाल बनारसीदास,बंगला रोड,जवाहर नगर दिल्ली–7 प्रथम संस्करण, 1968पृ.क्र.115
16. प्रा.सिंगारे अनिल,दक्षिण भारताचा इतिहास, सातवाहन ते यादव, के. एस. शतकरे, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती,जुन 1997,पृष्ठ क्र.54
17. शर्मा रामशरण,प्राचिन भारतातील राजकिय विचार आणि संस्था,अनुवाद डॉ.पंढरीनाथ रानडे,दत्तात्रय ग.पास्टे, डायमंड पब्लिकेशन्स,'शंकरप्रसाद',1991,सदाषिव पेठ, ग्राहकपेठ, पुणे–30, मराठी प्रथम आवृत्ती,2006पृष्ठ क्र. 311
18. डॉ.मिराशी वासुदेव विष्णु,भवभुती ग.रा.भटकळ,पॉप्युलर प्रकाशन,35 सी.,ताडदेव रोड,मुंबई 34 ब्ल्यु,सी,पहीली आवृत्ती 1968 पृ.क्र.309
19. डॉ.मिराशी वासुदेव विष्णु,भवभुती ग.रा.भटकळ,पॉप्युलर प्रकाशन,35 सी.,ताडदेव रोड,मुंबई 34 ब्ल्यु,सी,पहीली आवृत्ती 1968 पृ.क्र.136
20. डॉ.मुजुमदार,रमेशचंद्र,डॉ.अल्तेकर अनंत सदाशिव,वाकाटक–गुप्त युग,श्री सुंदरलाल जैन, मोतीलाल बनारसीदास,बंगला रोड, जवाहर नगर दिल्ली–7 प्रथम संस्करण,1968पृ.क्र.87
21. डॉ.मिराशी वासुदेव विष्णु,भवभुती ग.रा.भटकळ,पॉप्युलर प्रकाशन,35 सी.,ताडदेव रोड,मुंबई 34 ब्ल्यु,सी,पहीली आवृत्ती 1968 पृ.क्र.89